follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

www.rajdand.com

। पश्चिम महाराष्ट्र ।

RNI Regd No.७२१०५/९९ * वर्ष २५ * अंक ३०० * सातारा * गुरूवार, दि. २५ जुलै २०२४ * पाने ८ * किंमत ५ रू/

# पंचगंगेने ओलांडली धोका पातळी

## कोल्हापूरकरांचा जीव टांगणीला : १३ तासात पाणी पातळी ५ इंचानी वाढली : पंचगंगेने ओलांडली धोकापातळी







**कोल्हापूर :** जिल्ह्यात सर्वदूर धूमशान सुरू आहे. त्यामुळे नद्यांच्या पाणी पातळीत मोठी वाढ होत आहे. आज (दि.२५) सकाळी पंचगंगेची पाणी पातळी ४३ फूट झाली असून धोक्याची पातळी ओलांडली आहे. यामुळे कोल्हापूरला महापुराचा विळखा बसला आहे. पूरग्रस्त भागातून नागरीकांचे स्थलांतर सुरू असून प्रशासनाने नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. (घेश्रहरीीं ऋश्रेव)१३ तासात पंचगंगेची पाणी पातळी ५ इंचानी वाढलीपंचगंगा पाणलोट क्षेत्रामध्ये धुवाँधार पाऊस सुरू आहे. गेल्या १२ तासात पाणी पातळी ५ इंचाने वाढली. बुधवारी सायंकाळी ७ वाजता राजाराम बंधारा येथे पंचगंगेची पाणी पातळी ४२ फूट ०७ इंच होती. आज सकाळी ८ वाजता पाणी पातळी ४३ फूटावर पोहोचली आहे.

दरम्यान, कसबा बावडा एमआयडीसी-शिरोली (शिये) मार्गावर रस्ते ओढा येथे पाणी आले आहे. पाणीपातळीत वाढ झाल्याने वाहतूक बंद केली आहे. राधानगरी धरण ९८.२० टक्के भरलेराधानगरी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात कोसळत असलेल्या दमदार पावसामुळे राधानगरी धरण ९८.२० टक्के भरले आहे. धरण ३४७.५० फूट पाणी पातळी झाल्यानंतर पूर्ण क्षमतेने भरते. सध्या धरणाची पाणी पातळी ३४६.७२ फूट झाली असून धरण पूर्ण क्षमतेने भरण्यास अर्धा फूट पाणी कमी आहे. पावसाचा जोर कायम असून कोणत्याही क्षणी धरणाचे स्वयंचालित दरवाजे खुले होण्याची शक्यता आहे.अलमट्टी धरणातून २.४५ लाख क्युसेकने विसर्ग सुरूअलमट्टी धरणातून आज सकाळी सहा वाजता २ लाख ४५ हजार क्युसेस इतका विसर्ग सुरू आहे. सध्या पंचगंगेने धोका पातळी ओलांडली आहे. धरण क्षेत्रात काल रात्री पासून पावसाचा जोर वाढला आहे.

राधानगरीचा विसर्ग सुरु झाल्यास २०२१ ची परिस्थिती उद्भऊ शकेल अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.पुरस्थितीच्या अनुषंगाने प्रशासन सज्जसंभाव्य पुरस्थितीच्या अनुषंगाने प्रशासन अलर्ट मोडवर आहे. जिल्ह्यातील सर्वच नद्या या संत गतीने धोका पातळीकडे वाटचाल करत असल्याने नदीकाठच्या लोकांची चिंता वाढली असून, त्यांचे स्थलांतर सुरू झालं आहे. जिल्हा प्रशासनाच्या वतीने पूरग्रस्त भागातील कुटुंबे सुरक्षित स्थळी स्थलांतरित करण्यात येत आहेत. सध्या जिल्ह्यात सर्वत्र पाऊस जोरदार सुरु असल्यामुळे आवश्यकता असेल तरच घराबोहर पडा, तसेच पुरस्थितीच्या अनुषंगाने प्रशासन सज्ज असून नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी केले आहे.

# सिंचन, औद्योगिक, रस्ते, पर्यटनांच्या विकासकामांना गती द्या! मुख्यमंत्र्यांनी दिल्या अधिकाऱ्यांना सूचना

बुलढाणा जिल्ह्यातील सिंचन, रस्ते आदी लोकहिताची विविध कामे तातडीने मार्गी लावावीत, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. मोताळा औद्योगिक क्षेत्र जाहीर करण्यासाठी आणि त्याअंतर्गत कामाला गती देण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या. मुख्यमंत्री शिंदे यांच्या अध्यक्षतेखालील (२४ जुलै) रोजी बैठकीत बुलढाणा जिल्हा तसेच बुलढाणा विधानसभा मतदारसंघातील विविध विषयांचा आढावा घेण्यात आला.

छोटे प्रकल्प पूर्णत्वास आणा आणि पर्यटन सुविधांवर भर दया

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, लोकांना दिलासा देणारी छोटे-छोटे प्रकल्प, कामे वेळेत मार्गी लावण्यासाठी सर्वच यंत्रणांनी समन्वयाने प्रयत्न करावेत. छोट्या प्रकल्पामुळे सिंचन



क्षमता निर्माण होते, त्यातून शेतकऱ्यांना फायदा होतो. अशा कामांना प्राधान्य देण्यात यावे. पर्यटन हे मोठे क्षमता असलेले क्षेत्र आहे. त्यामुळे पर्यटन क्षेत्रातील प्रकल्पांना आणि सुविधा वाढविण्यावर भर देण्यात यावा, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

**जिल्ह्यातील अनेक प्रकल्पांवर सविस्तर चर्चा**

या बैठकीत हरमोड सिंचन तलावाची उंची वाढविणे, पलढग धरणाचे वाहून जाणारे पाणी नळगंगा धरणात वळविणे, गिरडा साठवण तलावाची क्षमता वाढविणे, किन्होळा शिवारामध्ये साठवण धरण, बुलढाणा नगरपरिषदेला सामाजिक सभागृह तसेच उद्यान व चौपाटीसाठी जागा हस्तांतरण येळगांव पर्यटन प्रकल्प, बुलढाणा -चिखली-मलकापूर रस्त्याचे काम, बुलढाणा जिल्ह्यातील चार ते पाच तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी उपयुक्त ठरेल असा फूडपार्क उभारणे अशी अनेक विषयांवर सविस्तर चर्चा झाली. ही बैठक सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे पार पडली. या बैठकीस मुख्यमंत्र्यांसोबत सहकार मंत्री तथा बुलढाणा जिल्ह्याचे पालकमंत्री दिलीप वळसे -पाटील, मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, आमदार संजय गायकवाड, आमदार श्वेता महाले आणि अधिकारीवर्ग उपस्थित होता.

# 'महाराष्ट्रातील १० टक्के मतदार मतदानापासून वंचित

## बावनकुळे यांनी निवडणूक आयोगाला दाखविल्या त्रुटी

**मुंबई :** बावनकुळे म्हणाले की, महाराष्ट्रातील बुथ आणि मतदार यादीत असणाऱ्या त्रुटीबद्दल माहिती दिली. २०१९ साली एका मतदारसंघात असणारे दीड लाख मते २०२४च्या लोकसभा निवडणुकीत नव्हती. यासाठी आम्ही नागपूर लोकसभा क्षेत्राचे उदाहरण या निवेदनातून दिले आहे. 'महाराष्ट्रातील १० टक्के मतदार मतदानापासून वंचित'; बावनकुळे यांनी निवडणूक आयोगाला दाखविल्या त्रुटीविधानसभा निवडणुका काही दिवसातच जाहीर होणार आहेत, या आधी सर्व राजकीय पक्षांनी जोरदार तयारी सुरू केली आहे. दरम्यान, या पार्श्वभूमीवरभाजपाप्रदेशाध्यक्षचंद्रशेखर बावनकुळेयांनी केंद्रीय निवडणूक आयोगाकडे काही मागण्या केल्या आहेत. 'विधानसभा निवडणुकीपूर्वी लोकसभा निवडणुकीच्या मतदार याद्यांतील दोष दूर करावे, अशी विनंती भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्षचंद्रशेखर बावनकुळे यांनी केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्तांकडे केली. लोकसभा निवडणुकीसाठी तयार करण्यात आलेल्या मतदार याद्यांमध्ये गंभीर त्रुटी असल्याने महाराष्ट्रातील सुमारे १० टक्के मतदार मतदानाच्या हक्कापासून वंचित राहिले, असे त्यांनी निदर्शनास आणून दिले. आज २४ जुलै रोजी नवी दिल्लीत केंद्रीय निवडणूक आयोगाचे मुख्य निवडणूक आयुक्त तसेच प्रदेशाध्यक्ष बावनकुळे, आमदार आशीष शेलार तसेच माजी खासदार किरिट सोमय्या यांच्यात सुमारे सव्वा तास चर्चा झाली. यावेळी बावनकुळे यांनी एक निवेदन त् दिले.यावेळी त्यांनी पत्रकारांसोबत संवाद साधला.

# भुयाचीवाडी येथील कृष्णा नदीवरील बंधारा गेला वाहून

## मुसळधार पावसाने बंधाऱ्याचे तीन पिलर जमीनदोस्त



**कोल्हापूर :** उंब्रज कृष्णा नदीवरील भुयाचीवाडी वरील बंधाऱ्याचे कवठे बाजूचे तीन पिलर कृष्णा नदीला आलेल्या पाण्याच्या प्रवाहाने नदीपात्रात पडले आहेत. बंधारा वाहून गेल्याने या मार्गावरुन होणारी वाहतूक थांबली असून नदीपात्राला धोका निर्माण झाला आहे. शेतीच्या पाण्याचा प्रश्न, किरकोळ वाहतूकीसाठी हा बंधारा वरदायणी ठरला होता.

**कृष्णा नदीच्या पाणी पातळीत कमालीची वाढ**

याबाबत अधिक माहिती अशी, मागील आठवड्याभरापासून मुसळधार पाऊस सुरू आहे. या पावसाने कृष्णा नदीच्या पाणी पातळीत कमालीची वाढ झाली आहे. पाण्याचा प्रवाह वाढल्याने भुयाचीवाडी ता. कराड येथील बंधारा वाहून गेला. सन १९९१-९२ साली या बंधाऱ्याचे काम करण्यात आले होते.

**शासकीय अधिकाऱ्यांसमवेत वाहून गेलेल्या बंधाऱ्याची पाहणी**

आज कृष्णा नदीवर असणाऱ्या कवठे - भुयाचीवाडी गावांना जोडणाऱ्या को.प. बंधाऱ्याचे कवठे बाजूचे तीन पिलर कृष्णा नदीला आलेल्या पाण्याच्या प्रवाहाने नदीपात्रात पडले. दरम्यान सह्याद्रि सहकारी साखर कारखान्याचे संचालक जशराज पाटील व जिल्हा परिषदेचे माजी शिक्षण व अर्थ समिती सभापती मानसिंगराव जगदाळे यांनी दुपारी शासकीय अधिकाऱ्यांसमवेत वाहून गेलेल्या बंधाऱ्याची पाहणी केली.

**पंचनामा करण्याच्या सूचना**

कवठे, भुयाचीवाडी, पेरले, खराडे, कालगाव, तुकाईवाडी या गावांना वरदान ठरणाऱ्या कृष्णा नदीवरील भुयाचीवाडी को.प बंधारा पाण्याच्या प्रवाहामुळे कवठे गावच्या बाजूचे तीन पिलर नदीपात्रात कोसळले असल्याची बातमी आमदार बाळासाहेब पाटील यांनी समजताच त्यांनी तात्काळ पाटबंधारे विभाग व महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क केला व पंचनामा करण्याच्या सूचना दिल्या.

**प्रशासनाकडून नागरिकांना आवाहन**

कृष्णानदीवरील भुयाचीवाडी येथील बंधाऱ्याचा काही भाग वाहून गेला आहे. याबाबात जलसंपदा विभागाने याबाबत तात्काळ आवश्यक कार्यवाही करण्याचे आदेश प्रशासनाने दिले आहेत. परिसरातील नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, धोकादायक ठिकाणी जाणे टाळावे असे आवाहन ही करण्यात आले आहे.

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासाला उजाळा

## अफजलखान वधाचा पुतळा प्रतापगडावर बसवणार



**सातारा :** छत्रपती शिवाजी महाराजांचा ज्वाजल्य इतिहासाचा साक्षीदार असलेल्या प्रतापगडावर इतिहास उजाळा मिळणार आहे. शिवरायांच्या इतिहासामध्ये त्यांची शौर्याची गाथा सांगणारे अनेक प्रकरण आहेत. यामध्ये अफजलखानाचा वध ही एक घटना आहे. छत्रपती शिवरायांची महती सांगणारा पुतळा तयार करण्यात आला आहे. याबाबत मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी हा पुतळा बसवण्याची घोषणा केली होती. तो प्रकल्प आता पूर्णत्वास येत असून याचे काही फोटो समोर आले आहेत. हा पुतळा प्रतापगडाच्या पायथ्याशी उभारला जाणार आहे.


छत्रपती शिवाजी महाराजांनी भल्या मोठ्या अफजलखानाचा वाघनखांनी कोथळा बाहेर काढला होता. आपल्या शौर्याची पुन्हा एकदा शिवरायांनी प्रचिती दिली होती. प्रतापगडावर हा वध करण्यात आला होता. या ऐतिहासिक प्रसंगाची आठवण करुन देणारा पुतळा तयार करण्यात आलेला आहे. सध्या पूर्णाकृती पुतळा तयार करण्यात आला असून त्याचे रंगकाम बाकी आहे. येत्या महिन्याभरामध्ये हा पुतळा प्रतापगडाच्या पायथ्याशी बसवण्यात येणार आहे. योगायोगाने शिवरायांनी वापरलेली वाघनखं देखील लंडन म्युझियममधून तीन वर्षांसाठी देशामध्ये आणण्यात आली आहे. सध्या ती साताऱ्यामध्ये पाहण्यासाठी ठेवण्यात आली आहे.

शिवाजी महाराजांचा पराक्रम सांगणारा हा अफजलखान वध पुतळ्याचे काम आता अंतिम टप्प्यात आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याचे प्रतीक म्हणून तयार करण्यात आलेला हा पुतळा १८ फुटांचा आहे.

# मराठा व धनगर समाजाच्याआरक्षणावर संसदेत चर्चा

## काय म्हणाल्या सोलापूरच्या खासदार प्रणिती शिंदे ?

**सोलापूर :** लोकसभेच्या खासदारप्रणिती शिंदेयांनी लोकसभेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात महाराष्ट्रातील अतिशय महत्त्वाचा मुद्दा मांडताना मराठा व धनगर समाजाला आरक्षण देण्याची मागणी केली.त्याचप्रमाणे महिला आरक्षण लागू करण्याची मागणीही संसदेच्या शुन्य प्रहारावेळीपीठासीन अधिकारी संध्या राय यांच्यासमोरकेली.भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मागासवर्गीयांना आरक्षण मिळवून दिले. पण केंद्र सरकार खासगीकरण करून आरक्षण संपविण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यामुळे आरक्षण मिळावे यासाठी मराठा समाज, धनगर समाज रस्त्यावर उतरून आंदोलन करीत आहे. मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे यांचे उपोषण सुरू आहे. त्यामुळे राज्यात तणावाची परिस्थिती निर्माण होत आहे. राज्याच्या सर्वच जिल्ह्यात आरक्षणासाठी आंदोलने, मोर्चो,



धरणे, उपोषण सुरू आहे.

केंद्रात आणि राज्यात भाजपाचे सरकार आहे, म्हणून लवकरात लवकर मराठा समाज व धनगर समाजाला आरक्षण मिळावे अशी विनंती लोसकभेत केली.तसेच विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी जातनिहाय गणना करण्याची मागणी केली आहे, तीही करावी अशी मागणी खासदारप्रणिती शिंदेयांनी यावेळी केली.

# शिवनेरीवरील शिवाजी महाराजांच्या पादुका अंबाबाई चरणी

**कोल्हापूर :** शिवनेरी गडावरील शिवाई देवीच्या मंदिरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पादुका बुधवारी करवीर निवासिनी अंबाबाईच्या चरणी ठेवण्यात आल्या. अंबाबाई मंदिर हक्कदार श्रीपूजक मंडळाच्या वतीने या पादुकांवर मंत्रघोषात विधिवत अभिषेक करण्यात आला.

शिवाजी महाराजांचे जन्मस्थान असलेल्या शिवनेरी गडावर शिवाई देवीच्या मंदिरात छत्रपती शिवरायांच्या धातूच्या पादुका स्थापन करण्यात आल्या आहेत. गेल्या २८ वर्षांपासून दरवर्षी शिवभक्त पन्हाळा पावनखिंड या मोहिमेत या पादुकांसह सहभागी होतात. यंदा प्रथमच या पादुका वाडी रत्नागिरी येथील जोतिबा मंदिर व अंबाबाई मंदिर येथे आणण्यात आल्या. मोहिमेचे समन्वयक डॉ. संदीप महिंद, कृष्णा भोसले, राजेश भोजे, उमेश दहीने, विनायक सुतार हे पादुका घेऊन मंदिरात आले. पादुकांवर अभिषेक केल्यानंतर भाविकांना दर्शनासाठी ठेवण्यात आल्या.

यावेळी श्रीपूजक मंडळाचे सचिव माधव मुनीश्वर, सहसचिव अजित ठाणेकर, केदार मुनिश्वर, अनिकेत अष्टेकर, योगेश जोशी, सचिन ठाणेकर, सचिन गोटखिंडीकर, शाम पुरोहित, संजय फलटणकर यांच्यासह देवस्थान समितीचे सचिव सुशांत बनसोडे, व्यवस्थापक महादेव दिंडे यांच्यासह भाविक उपस्थित होते.

# लोणंद येथील मयत इसमाच्या खून प्रकरणी आरोपी जेरबंद



**सातारा :** लोणंद येथील रेल्वे स्टेशनच्या गार्डनमध्ये ३५ वयोगटातील अनोळखी इसमाचा मृतदेह आढळून आला होता. या इसमाचा खून आर्थिक देवाणघेवाणीतून झाल्याचे स्पष्ट झाले असून स्थानिक गुन्हे शाखेने कारवाई करून मनोज तिवारी वय २५ मूळ राहणार इलाहाबाद उत्तर प्रदेश सध्या राहणार कुर्ला कलिना एअरपोर्ट जवळ याला जेरबंद केले आहे. सहा महिन्यापूर्वी झालेल्या आर्थिक देवाणघेवाणीतून दोघांमधील भांडणे टोकाला गेली त्यामुळे तिवारी याने संबंधित इसमाचा डोक्यात सिमेंटचा ब्लॉक घालून खून केल्याची कबुली दिली.

स्थानिक गुन्हे शाखा व लोणंद पोलीस यांनी संयुक्तरीत्या हा तपास केला आहे .यासंदर्भात रेल्वे प्रोटेक्शन फोर्सचे अंमलदार विजय गोरडे यांनी लोणंद पोलीस ठाण्यात १५ जुलै २०२४ रोजी फिर्याद नोंदवली होती. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अरुण देवकर यांच्या सूचनेप्रमाणे सहायक निरीक्षक रोहित फार्णे, व पोलीस उपनिरीक्षक अमित पाटील यांच्या विशेष पथकाने हा तपास केला तांत्रिक विश्लेषण, सीसीटीव्ही फुटेज तसेच साखळी तपास या माध्यमातून या पथकाने लोणंद व फलटण परिसरात कसून तपास करून परप्रांतीय इसमाचा मागोवा काढला .या इसमाला फलटण येथून ताब्यात घेण्यात आले. सदर इसम आणि आरोपी हे दोघे मुंबईला एका केटरर्सकडे कामाला होते त्या ठिकाणी सुमारे सहा महिन्यापूर्वी दोघांचे पैशाच्या आर्थिक देवाणघेवाणीवरून वाद झाले होते. सदर आरोपीने इसमाचा खून करून त्याचा मृतदेह लोणंद रेल्वे स्टेशनच्या गार्डनमध्ये टाकून दिला हे स्पष्ट झाले.

हा अतिशय क्लिष्ट स्वरूपाचा गुन्हा होता मात्र तांत्रिक कौशल्य द्वारे स्थानिक गुन्हे शाखा व लोणंद पोलिसांनी हा गुन्हा उघड केला या कारवाई मध्ये विश्वास शिंगाडे, अनिल घाडगे, संतोष सपकाळ, विजय कांबळे, संजय शिर्के, शरद बेबले, निलेश फडतरे, लक्ष्मण जगधने ,प्रवीण फडतरे, अमित माने, अविनाश चव्हाण, गणेश कापरे ,स्वप्निल कुंभार,प्रवीण कांबळे ,अरुण पाटील, यांनी तपासात भाग घेतला होता.

# मुळा-मुठा नदीच्या सुशोभीकरण प्रकल्पाला केंद्र सरकारचा बूस्ट

**पुणे :** शहरातून वाहणाऱ्या मुळा-मुठा नदीच्या सुशोभीकरण प्रकल्पाला केंद्र सरकारचा बूस्ट मिळाला आहे. केंद्र सरकारच्या २०२४-२५ च्या अर्थसंकल्पात या प्रकल्पासाठी ६९० कोटींच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. गुजरातमधील साबरमती नदीच्या धर्तीवर शहरातून वाहणा-या मुळा-मुठा नदीकाठचे ४४ किमी लांबीचे सुशोभीकरण करण्यात येणार आहे.

या प्रकल्पास २०१८ ला मान्यता मिळाली असून, यासाठी ४ हजार ७२७ कोटी रुपये खर्च वेणार आहे.प्रकल्पाचे काम ११ टप्प्यांत करण्यात येणार असून, ११ पैकी ३ टप्प्यांचे काम प्रायोगिक तत्त्वावर करण्यात येत आहे. एका टप्प्यासाठी येणारा ७०० कोटी रुपये खर्च महापालिकेच्या निधीतून करण्याचा व उर्वरित खर्च पीपीपी तत्त्वावर करण्यात येणार आहे. प्रकल्पातील टप्पा क्र. ९ मध्ये संगमवाडी ते बंडगार्डन या ३.७ किलोमीटर लांबीचे नदीं सुशोभीकरणाचे काम बी. जे. शिर्के कंपनीकडून केले जात आहे. हे काम ६५ टक्के पूर्ण झाल्याचा दावा महापालिका अधिकाऱ्यांनी केला आहे, तसेच, रप्पा क्र. १० व ११ बंडगार्डन ते मुंढवा चादरम्यानचे काम पीपीपी तत्त्वावर ने. कुमार या कंपनीकडून केले जात आहे.हे काम ५.३ किलोमीटर लांबीचे असून, यामध्ये कोरेगाव पार्कच्या बाजूने बंडगार्डन ते मुंस्वा यादरम्यान ३० मीटर रुंदीचा रस्ता केला जात आहे. या टप्प्याचे काम आत्तापर्यंत २५ टक्के झाले असून, नदी सुशोभीकरण प्रकल्पाचे सरासरी काम ५० टक्के पूर्ण झाले आहे. घेश्रहर्‍िी ठरळप णविरींश । पूरस्थितीचा सामना करण्यासाठी कोल्हापूर प्रशासन यंत्रणा सज्ज; जाणून घ्या निवारा केंद्रया प्रकल्पासाठी केंद्राकडून ४४०० कोटी रुपयां रुपये निधी मिळावा, यासाठी महापालिकेकडून प्रयत्न केले जात होते या प्रयत्नांना यश आले असून, केंद्रीय अर्थसंकल्पात मुळा-मुठा नदी सुधारणेरवठी ६९० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.





# सासवड : वीर फाटा बनला धोकादायक

## अपघातांची मालिका सुरूच

**सासवड :** पुणे-पंढरपूर महामार्गावरील सासवड (ता. पुरंदर) येथील वीर फाटा हा वाहनचालकांसाठी धोकादायक बनलेला आहे. या ठिकाणी अपघातांची मालिका सुरूच आहे. मात्र, तरीदेखील या ब्लॅक स्पॉट अर्थात मृत्यूच्या सापळ्याकडे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे दुर्लक्ष असल्याचे दिसून येत आहे.

वीर फाटा येथे अत्यंत धोकादायक वळण आहे. रस्त्यावर मोठे खड्डे पडलेले आहेत, काही ठिकाणी रस्ता खचून पाणी साचले आहे. या खड्ड्यांमुळे वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागत आहे. या ठिकाणी रोज छोटे-मोठे अपघात घडत आहेत. हा प्रवास जीवघेणा झाला आहे.

ताथेवाडीच्या वाडी-वस्तीवरील शेतकर्यांची शेती पालखी मार्गाच्या पलीकडच्या बाजूला आहे. रेडिएटर कंपनीसमोरील रस्ता ओलांडताना शेतकर्यांना जीव मुठीत धरून जावे लागते. रासकरमळा येथील जिल्हा परिषदेच्या शाळेसमोर एकेरी रस्ता व पुढे धोकादायक पूल असल्याने या भागात वाहतूक कोंडी व अपघात नित्याचे झाले आहेत.

जेजुरी नाका व शासकीय विश्रामगृहासमोरच्या रस्त्याला थोडा उतार व मध्येच अनेक स्पीडब्रेकर आहेत. पुढे कर्हा नदीवरील पूल अरुंद असून, पुढे एकेरी रस्ता आणि दुहेरी पुलाच्या ठिकाणी जाणार्या पुलाला उंची आहे. दोन्ही पुलांवरील वाहने दोन्ही बाजूला पुन्हा एकेरी रस्त्यावर येतात, त्या वेळी वाहनचालकांची तारांबळ उडते. त्यामुळे नेहमी वाहतूक कोंडी होते किंवा अपघात देखील घडतात. त्यात अनेकांना आपला जीव गमवावा लागला आहे. याबाबत स्थानिकांनी प्रशासनाकडे दुरुस्तीची मागणी केली आहे. मात्र, तरी देखील कोणतीच दुरूस्ती झालेली नाही, असे स्थानिक सचिन राऊत यांनी सांगितले.

# अलमट्टी धरणातून २.४५ लाख क्युसेकने विसर्ग सुरू

## राधानगरीचा विसर्ग सुरु झाल्यास पूरस्थिती उद्भवणार

अलमट्टी धरणातूनआज सकाळी सहा वाजता २ लाख ४५ हजार क्युसेस इतका विसर्ग सुरू आहे. सध्या पंचगंगा पाणी पातळी स्थिर आहे. मात्र धरण क्षेत्रात काल रात्री पासून पावसाचा जोर वाढला आहे. राधानगरीचा विसर्ग सुरु झाल्यास २०२१ ची परिस्थिती उद्भऊ शकेल अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. आलमट्टीची

पाणी पातळी ५१३ मीटर केली तरच महापुराचे नियंत्रण होणार आहे. अन्यथा कोल्हापूरकरांना गंभीर पूर परिस्थितीला सामोरे जावे लागणार आहे, असे जाणकारांचे म्हणणे आहे. तसेच पुढचे तीन दिवस मुसळधार पावसाचा इशारा



हवामान विभागाने दिला आहे.

**नागरिकांना सतर्कतेचा इशारा**

**राधानगरी धरण ९८.२०टक्के भरलेराधानगरी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात कोसळत असलेल्या दमदार पावसामुळे राधानगरी धरण ९८.२० टक्के भरले आहे. धरण ३४७.५० फूट पाणी पातळी झाल्यानंतर पूर्ण क्षमतेने भरते. सध्या धारणाची पाणी पातळी ३४६.७२ फूट झाली असून धरण पूर्ण क्षमतेने भरण्यास अर्धा फूट पाणी कमी आहे. पावसाचा जोर कायम असून कोणत्याही क्षणी धरणाचे स्वयंचालित दरवाजे खुले होण्याची शक्यता आहे.**

# शिवरायांच्या वस्तू संग्रहालयाची विद्यार्थ्यांना भुरळ

## विनामूल्य प्रवेश; ऐतिहासिक वस्तूंविषयी मोठी उत्सुकता

**सातारा :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याची अन् देदीप्यमान इतिहासाची साक्ष देणारे प्रेरणादायी वस्तू संग्रहालय पाहण्यासाठी शालेय विद्यार्थ्यांची मोठी गर्दी होत आहे. या संग्रहालयात असलेल्या ऐतिहासिक वस्तूंविषयी विद्यार्थ्यांत मोठी उत्सुकता दिसून येत आहे.

मुख्यमंत्री ,मा. एकनाथ शिंदे साहेब यांच्या हस्ते नुकतेच वस्तू संग्रहालयाचे उदघाटन झाले आहे. या संग्रहालयात शिवकालीन शस्त्रे, पत्रांचा संग्रह, शिवकालीन नाणी, चिलखत, तलवारी, तोफा अशा वैविध्यपूर्ण, वैशिष्ट्यपूर्ण पाहावयास मिळत आहेत. विद्यार्थ्यांना त्याबद्दल आकर्षण दिसत आहे. विद्यार्थ्यांसाठी सकाळच्या सत्रात हे वस्तू संग्रहालय विनामूल्य पाहायला उपलब्ध करण्यात आले आहे. लंडन येथील व्हिक्टोरिया अल्बर्ट म्युझियममधील ऐतिहासिक वाघनखे नुकतीच या संग्रहालयात आणण्यात आली आहेत. त्यांचीही भुरळ विद्यार्थ्यांत दिसून येत आहे. यानिमित्त संग्रहालयात असलेली सतराव्या अन् अठराव्या शतकातील शस्त्रास्त्रे व ऐतिहासिक वस्तू विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी उपयुक्त ठरत आहेत.

छत्रपती शिवरायांच्या जाज्वल्य पराक्रमाचा इतिहास या वस्तू संग्राहलयातून पुढे येत आहे. तो विद्यार्थ्यांपर्यंत पोचविण्यासाठी जिल्हा परिषदेने पुढाकार घेतला आहे. त्या दृष्टीने नियोजन करण्यात आले आहे. अधिकाधिक संख्येने हे वस्तू संग्रहालय विद्यार्थ्यांना पाहता यासाठी प्रयत्न सुरु आहेत.

# कडवी धरण 'ओव्हर फ्लो'



**विशाळगड :** सुभाष पाटीलशाहूवाडी तालुक्यातील कडवी खोऱ्याला वरदान ठरलेले निनाई परळे येथील कडवी धरण ओव्हर फ्लो झाले. धरणातील सांडव्यावरून पूर्ण क्षमतेने पाण्याचा विसर्ग कडवी नदीपात्रात होत असल्याची माहिती कडवी धरण शाखा अभियंता खंडेराव गाडे यांनी दिली. गेल्या चोवीस तासांत धरण क्षेत्रात १५४ मिमी पाऊस झाला. धरणाच्या विद्युत गृहातून २२० क्यूसेक पाण्याचा विसर्ग कडवी नदीपात्रात सुरू आहे.कडवी धरणाची पाणी साठवण क्षमता २.५१ टीएमसी आहे. धरणाची पाणीपातळी ६०१.२५ मीटर तर ७१.२४० दलघमी पाणीसाठा आहे. धरण पाणलोट क्षेत्रात तीन हजार ते साडेतीन हजार मिमी इतका पाऊस पडतो. गतवर्षी धरण तीनदा ओव्हर फ्लो झाले. गतवर्षी याच दिवशी धरणाचा पाणीसाठा ४९.६० दलघमी इतका होता. धरण ७० टक्के भरले होते. गतवर्षीपेक्षा धरणात ३० टक्के पाणीसाठा अधिक आहे. सध्या धरणातून प्रतिसेकंद २२० क्यूसेस पाण्याचा विसर्ग कडवी नदीपात्रात सुरू असल्याने वालुर, सुतारवाडी, करुंगळे, भोसलेवाडी, पेरिड, शिरगाव, सावर्डे, पाटणे या आठ ठिकाणच्या कोल्हापूर पद्धतीचे बंधारे तसेच कडवी नदीकाठची शेती पाण्याखाली गेली आहे. परळे निनाई, भेंडवडे, लोळाणे, पुसार्ले, आळतूर, वारूळ,करुंगळे, निळे, कडवे, येलूर, पेरिड, भोसलेवाडी, गाडेवाडी, मलकापूर, कोपार्डे, सांबु, शिरगाव, ससेगाव, सावर्डे, मोळवडे, सवते, शिंपे, पाटणे या २२ गावांना या धरणाचा शेती व पिण्याच्या पाण्यासाठी वापर होत असतो.

पाण्याचे योग्य नियोजन केल्याने मे अखेर ४७ टक्के पाणीसाठा शिल्लक होता. यावर्षी एकदाही पाणी उपसाबंदी करण्यात आली नाही. लांबलेला पाऊस, घटत चाललेला पाणीसाठा यामुळे पाणीबाणी निर्माण होते की काय? याची चिंता कडवी नदीकाठावरील २२ गावांना लागली होती. मात्र पावसाच्या दमदार आगमनाने २२ दिवसांत कडवी धरण पुर्ण क्षमतेने वाहू लागल्याने नागरिकांची चिंता मिटली आहे. गतवर्षी हे धरण २९ जुलै रोजी भरले होते.(घेश्रहर्‍िी ठरळप) गणेशोत्सव स्पेशल २०२ गाड्यांचे आरक्षण एक मिनिटात फुल्लकडवी पाणलोट क्षेत्रात आजअखेर १८५७ मिमी पाऊस बरसला आहे. गतवर्षी हा आकडा १३९४ मिमीहोता. कडवी नदीपात्रात पाण्याचा विसर्ग सुरू असल्याने नदीकाठची ऊस व भाताची पिके पाण्याखाली गेली आहेत. अनेक ठिकाणी ओढ्यांचे पाणी पिकांमध्ये शिरले आहे.

# 'कस्तुरबा' विरोधात 'आशां'चे राजीनामास्त्र

**सातारा :** येथील कस्तुरबा प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य अधिकारी, कर्मचाऱ्यांकडून मानसिक छळ होत आहे. त्याविरोधात सामुहिक राजीनामा देणार असल्याचा इशारा सातारा जिल्हा आशा व गटप्रवर्तक युनियनममधील आशांनी दिला आहे. संबंधित निवेदन सातारा पंचायत समितीच्या तालुका आरोग्य अधिकाऱ्यांना दिले आहे.

निवेदनात नमूद केले आहे की, आशास्वयंसेविकांना विनामोबदल्याची अनेक कामे सांगून, दबाव टाकून करुन घेतली जात आहेत. त्यातून सातारा शहरातील कस्तुरबा प्राथमिक आरोग्य केंद्रातील अधिकारी आशांचा मानसिक छळ करत आहेत. कामाचा मोबदला मिळवण्यासठी भरावयाचा अर्जही संबंधितांकडून दिला जात नाही.

त्याविरोधात सामुहिक राजीनामा देणार आहे. लसीकरणाचे निरोप देणे, त्यांना आरोग्य केंद्रापर्यंत आणणे, त्यांच्या याद्या बनविणे आदी कामे आशांची आहेत. तरीही दबावतंत्र वापरुन त्यांना सतरंज्या उचलण्यास लावल्या जातात. माता बालसंगोपनाचे कार्ड लिहिणे, रजिस्ट्रेशन करणे, सिरिज नष्ट करणे.

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार करणाऱ्या नराधमाच्या लोणंद पोलिसांनी आवळल्या मुसक्या

**सातारा :** संत ज्ञानेश्वर माऊलीच्या पालखीचे दर्शन घेऊन रात्री उशिरा आईसह घरी निघालेल्या अल्पवयीन मुलीचे दुचाकीवरून अपहरण करून तिच्यावर अत्याचार करणाऱ्या आरोपीस लोणंद पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने कौशल्य पूर्वक तपास करून जेरबंद केले आहे. राकेश भगवान भंडलकर, वय २५ राहणार तांबवे, तालुका फलटण सध्या राहणार ताथवडा तालुका फलटण असे संबंधित आरोपीचे नाव आहे या नराधमास न्यायालयासमोर हजर केले असता दोन दिवसाची पोलीस कोठडी देण्यात आली आहे.

या प्रकरणी संबंधित मुलीच्या आईने लोणंद पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदवली होती दिनांक ७ जुलै रोजी पहाटे दीड वाजता ही अल्पवयीन मुलगी आईसोबत घरी जात असताना संबंधित इसमाने आपल्या बजाज पल्सर मोटरसायकल वरून या दोघींना मी त्याच भागात जात आहे असे सांगून गाडीवर घेतले पाडेगाव टोल नाका येथे गेल्यानंतर सदर महिलेला खाली उतरून तेथून मुलीसह पोबारा केला नंतर अल्पवयीन मुलीवर अत्याचार करून पाडेगाव तालुका खंडाळा येथील गावच्या हद्दीत रस्त्यावरील एका रसवंतीगृहाजवळ आडमार्गाने येऊन सोडून दिले तसेच या घटनेची वाचता केल्यास तिच्या कुटुंबीयांना जीवे मारण्याची धमकी दिली.

या घटनेमुळे संबंधित अल्पवयीन मुलगी प्रचंड दहशतीखाली होती. तपासी अधिकाऱ्यांनी पीडितेला विश्वासात घेऊन काही स्थळ दाखविली. त्यातील एका हॉटेलचे नाव पीडितीने सांगितल्यावर तपासाला वेग आला. लोणंद पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सुशील भोसले, पोलीस निरीक्षक व पुणे प्रकटीकरण शाखेचे सर्जेराव सूळ, विठ्ठल काळे, संतोष नाळे, केतन लाळगे गोविंद यांनी सापळा रचून या आरोपीस त्याच्या राहत्या परिसरातून अटक केली सदर अल्पवयीन मुलगी अनुसूचित जातीमधील असल्यामुळे आरोपीवर ट्रॉसिटीची केस दाखल करण्यात आली आहे. पोलिसांनी दोन पथकांच्या माध्यमातून आरोपीचा कसून शोध घेऊन त्याला जेरबंद केले आहे या कौशल्य पूर्वक तपासाचे पोलीस अधीक्षक समीर शेख अतिरिक्त पोलीस अधीक्षक आचल दलाल यांनी अभिनंदन केले आहे.

# दांडेघर हे अखख गाव मालकीचे सांगून व्यवहार करणाऱ्या आरोपीची व व्यवहारची चौकशी करण्याचे कोर्टाचे आदेश

**वाई :** दांडेघर (ता. महाबळेश्वर) गावातील देवस्थानाच्या तसेच वैयक्तिक कुळाच्या जमिनीचे प्रकरण न्यायप्रविष्ठ असताना आणि सुप्रीम कोर्टात केस हरले असतानासुद्धा जमीन परस्पर विकण्याचे करारनामे करून दांडेघर ग्रामस्थांची, कोर्टाची व इतर शासकीय कार्यालयांची दिशाभूल करून वैयक्तिक लाभासाठी फसवणूक केल्याचे आरोपासंदर्भात संबंधित आरोपींची पोलिसांना सखोल चौकशीचे आदेश कोर्टाने दिले असल्याची माहिती पत्रकार परिषदेत मुंबई हायकोर्टचे वकील ड. अविनाश गोखले यांनी दिली आहे.

या पत्रकार परिषदेला ड अविनाश गोखले यांचेसह उपसरपंच जनार्दन कळंबे, अजित कळंबे , सचिन खरात, नारायण शेठ बेलोशे, सुभाष कासुर्डे, भरत कळंबे, अरविंद कळंबे अशोक कासुर्डे, आनंदराव पवार, राजेंद्र खरात, अर्जुन सोनावणे, नितीन कळंबे, रवींद्र कळंबे, आनंदा मराठे, अमोल शां. कळंबे, सुधीर कळंबे, अरविंद शं. कळंबे,जयदीप कळंबे, बजरंग पवार, दत्तात्रय कळंबे, वैभव कळंबे, चंद्रकांत पवार, संतोष कळंबे, रुपेश कळंबे, नामदेव मराठे, रमाकांत कळंबे, संजीव कळंबे, प्रवीण सपकाळ, केदार जाधव, अनिल पवार, सुनील कळंबे, किसन कळंबे, बाळू बेलोशे, जगन्नाथ कळंबे, गजानना कळंबे आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

याबाबत अधिक माहिती देताना ड. गोखले म्हणाले दांडेघर ता. महाबळेश्वर येथील देवस्थानाच्या तसेच वैयक्तिक कुळाच्या जमिनीमधील हॅरिसन फॉली (थापा) १८ ऐकर आणि गावाचा परिसर २४७ हेक्टर या जागांचे मालक समजणारे सुहास लक्ष्मण वाकडे, रविराज गजानन जोशी दोघेही रा. पुणे यांनी महाबळेश्वर ऐवजी हवेली, पुणे येथे कागदपत्रे करून परस्पर व्यवहार केला आहे. तसेच या व्यवहरापोटी त्यांनी बक्कळ पैसा पदरात पाडून घेतला आहे. या व्यवहारांच्या निषेधार्ह ग्रामस्थानी २४ सप्टे २०२२ रोजी पांचगणी पोलीस ठाण्यात धाव घेतली होती. ग्रामस्थांची फसवणूक झालेबद्दल या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषी चौघांवर तातडीने कारवाई करावी अशी मागणी ग्रामस्थांनी केली होती.

सुहास वाकडे, रविराज गजानन जोशी यांच्यातील समजूती करारनाम्यान्वये केदारेश्वर देवस्थानचा तसेच वैयक्तिक कूळ असलेल्या ग्रामस्थांच्या जमिनी न्यायालयात तसेच महसूल मंत्री यांच्याकडे दावे न्यायप्रविष्ठ असताना तिरहाईत इसमांचे हक्क प्रस्थापित करून त्यातून वैयक्तिक लाभ करून घेतला. नुकताच सर्वे नंबर दहा (थापा पॉइंट किंवा हॅरिसन फॉली या नावाने प्रसिद्ध असलेल्या) या जमिनीचा सुहास वाकडे, रविराज जोशी यांनी मोठा व्यवहार केल्याचे ऐकिवात आहे. यामध्येही करोडो रुपयांची फसवणूक झाल्याचा अंदाज आहे. यातही कुळ असणाऱ्या गावकऱ्यांची फसवणूक झाली आहे.

ग्रामस्थांनी ड. अविनाश गोखले यांचेकरवी कोर्टात दाद मागितली. त्यानंतर सुहास वाकडे व रविराज गजानन जोशी यांनी सुप्रीम कोर्टात दावा हरूनही आणि महाबळेश्वर येथे व्यवहार करणे ऐवजी हवेली येथे परस्पर व्यवहार करून गावाची फसवणूक करून पैशाचे व्यवहार केले आहेत. त्यामुळे त्यांनी केलेले सर्व करारनामे हे संपूर्णपणे बेकायदेशीर असून यामुळे, पूर्वांपार कुळ असलेल्या दांडेघर ग्रामस्थांची फसवणूक तसेच केदारेश्वर देवाच्या मिळकतींचे परस्पर हस्तांतरण करून न्यायालयाचा तसेच इतर शासकीय कार्यालयाचा अवमान केला आहे. त्यामुळे पूर्वंपार रहिवासी असताना येथील लोकांना बेघर करण्याचा डाव रचला असल्याचे मत मांडून अँड गोखले यांनी पुराव्यानिशी ही बाब कोर्टाच्या निदर्शनास आणून दिल्याने कोर्टाने ग्रामस्थांचे बाजूने निकाल देत या सर्व व्यवहार तसेच प्रकरणाची सखोल चौकशी करावी असे आदेश कोर्टाने पोलिसांना दिले आहेत. आणि याचा अहवाल तातडीने ३० ऑगस्ट पर्यंत कोर्टाला देण्याचे आदेश दिल्याचे यावेळी ॲड गोखले यांनी यावेळी सांगितले. यामुळे ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.

सुहास वाकडे व रविराज जोशी यांनी महाबळेश्वर तालुक्यासह वाई तालुक्यातील गावे सुधा आपले मालकीचे असल्याचा दावा करून, तालुक्यातील महाबळेश्वर, लिंगमळा ,प्रतापगड, वेण्णा लेक, आर्थरसीट पॉइंट, गोडवली, दांडेघर, पांचगणी, वाई आदी परिसरातील जमिनीही विकण्याचे करार करून अनेकांची फसवणूक केली आहे. या प्रकरणातही त्यांच्यावर पोलीसांत तक्रार आहे, त्यामुळे आता या ही प्रकरणात त्यांची चौकशी होणार का? याची उत्सुकता सर्वांना लागून राहिली आहे.

गेले अनेक दिवस या प्रश्नांवरून ग्रामस्थ चिंताग्रस्त झाले होते. राजकीय व्यासपीठावर, पोलीस प्रशासनाकडे, शासकीय कार्यालयांकडे धाव घेवून न्यायासाठी प्रयत्न चालू केले होते. परंतु न्यायालयाने दिलेल्या या निर्णयामुळे सर्व ग्रामस्थांना दिलासा मिळाला असून ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

# सर सकट आले खरेदीसाठी कोरेगाव बाजार समितीच्या भरारी पथकाचे छापे

## व्यापाऱ्यांना बजावल्या नोटीसा

**कोरेगाव** : वर्ग बाजार समितीत झालेल्या बैठकीपूर्वी ज्या शेतकरी आणि आले व्यापाऱ्यांनी आले सदस्य केले होते, त्यांना १८ जुलै पर्यंत काढणी व्यवहार पूर्ण करण्यासाठी विहित वेळ वाढवून दिली होती त्यानंतर व्यापाऱ्यांनी नवा जुना असा भेद न करता सरसकट आले खरेदी ठरावाप्रमाणे व्यवहार होतात का यासाठी कोरेगाव तालुका शेती उत्पन्न बाजार समितीच्या फिरत्या पथकाने विविध ठिकाणी अचानक छापे टाकून तपासणी केली.

कोरेगाव बाजार समितीचे भरारी पथक यांनी तालुक्यात होणाऱ्या आले खरेदी विक्रीवर नियंत्रण ठेवण्यासाठी फिरती पथकाच्या माध्यमातून खेड-नांदगिरी ,सातारा रोड ,पाडळी येथे नदीवर चालू असलेल्या आले धुनी आणि भराई करणाऱ्या व्यापारी वाहनांची व खरेदी केलेल्या आले शेतमालाची पाहणी केली. त्यावेळी खरीददार व्यापारी बाजार समितीने दिलेल्या निर्देशाप्रमाणे जुना - नवा असा एकत्रित माल खरेदी करतात किंवा कसे याबाबत तपासणी केली. ज्या व्यापारी वर्गाचे बाजार समिती बैठकीपूर्वी सौदे झालेले होते अशा शेतकरी व्यापाऱ्यांना दिनांक १८ जुलै पर्यंत काढणी करून व्यवहार पूर्ण करण्यासाठी विहित वेळ वाढवून दिलेली होती. त्यानंतर काल बाजार समितीच्या भरारी पथकाने या निर्देशांचे अंमलबजावणी होण्याकरता सर्व व्यापारी वर्गाकडून सहकार्य व्हावे अशी अपेक्षा व्यक्त केली होती.कोरेगाव परिसरात पाऊस सुरू असल्यामुळे व खांदणीसाठी वाहतुकीसाठी विलंब होऊन अडचणी येत आहेत असे व्यापारी वर्गाकडून सांगण्यात आले.तरीही कायमस्वरूपी नवा जुना असा एकत्रित शेतमाल खरेदी करून विक्री करण्यासाठी पुढे इतरत्र मार्केटला पाठवला जाईल. असे व्यापारी वर्गाकडून सांगण्यात आले . फिरती पथकाच्या तपासणी वेळी अशा आशयाचे लेखीजबाब व्यापारी व समितीच्या वतीने करण्यात आलेले आहेत.

फिरती पथकामध्ये बाजार समितीचे सभापती ड.पांडुरंग भोसले, दिनेश आप्पा बर्गे, अमर बर्गे, शेतकरी संघटनेचे कोरेगाव तालुका अध्यक्ष जीवन शिर्के, बाजार समितीचे सचिव संताजी यादव, शाखाप्रमुख वाठार स्टेशन जयसिंग जगदाळे यांनी ही कामगिरी केली. कोणत्याही शेतकऱ्याची अडवणूक झाल्यास बाजार समिती संबंधित व्यापाऱ्यांवर कडक कारवाई करेल अशा सुचनाही बाजार समितीच्या वतीने सर्व व्यापारी वर्गांना दिलेल्या आहे. शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होऊ देणार नाही. संबंधित बाजार समितीच्या फिरती पथकाच्या वतीने कार्यक्षेत्रातील संदीप विठ्ठल कदम (खेड) दत्तात्रय कदम (चंचली), संकेत चतुर नांदगिरी सुबोध फाळके (पाडळी) या व्यापाऱ्यांना यावेळी लेखी नोटीसा बजावल्या व लेखी जबाब नोंदवून दप्तरी कार्यवाही करण्यात आली.

# श्री संत घाडगेनाथ हायस्कूल कोळे येथे शिक्षण सप्ताह अंतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन

**उंडाळे** : महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद व पंचायत समिती कराड शिक्षण विभागामार्फत आयोजित शिक्षण सप्ताहाच्या पहिल्याच अध्ययन अध्यापन साहित्य दिवस यामध्ये इयत्ता पाचवी- सहावीच्या विद्यार्थ्यांनी तक्ते बनवणे, फळे बनविणे, पक्ष्यांचे मुखवटे तयार करणे, विज्ञान कोडी इयत्ता सातवी आठवीच्या विद्यार्थ्यांनी कागद काम, कागदी वस्तू बनवणे म्हणी व म्हणींचे खेळ, भाषिक खेळ यातून ज्ञान मिळवण्याचा प्रयत्न केला तर इयत्ता नववी -दहावीच्या विद्यार्थ्यांनी विज्ञान साहित्याची ओळख, विज्ञान तक्त्यांचे प्रदर्शन व विज्ञान कोडे तयार करणे व सोडवणे यातून आनंद दायी शिक्षण घेतले तसेच विद्यार्थ्यांनी वाचन क्लब निर्मिती, प्रकट वाचनाचा सराव केला.

तर दुसऱ्या दिवशी मूलभूत संख्याज्ञान व साक्षरता दिवस गणितीय परिपाठ, निपुण प्रतिज्ञा, गणित तज्ञांची माहिती ,गणिती कोडी सोडवणे व गणितीय खेळ खेळणे व संख्याज्ञान यांची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली त्याचबरोबर भौमितिक आकृत्या, संगीतमय पाढे. प्रश्न मंजुषा, घोटीव कागदापासून भौतिक आकृत्या तयार करणे मुखवटे तयार करणे, काडीच्या पेटी व आईस्क्रीमच्या काड्यांच्या पासून आकृती तयार करणे, रांगोळी तयार करणे, भौमितिक रचना व प्रमेय लेखन करून घेण्यात आले.

अशाप्रकारे विविध उपक्रमातून विद्यार्थ्यांना शिक्षण दिल्यामुळे पुस्तकी ज्ञानावर आधारित न राहता स्वतः कृती करून त्यातून आनंददायी शिक्षण प्राप्त करत आहेत.या कार्यक्रमाचे नियोजन मुख्याध्यापक परशुराम डाळे यांनी केले त्यांना सुरेश कराळे, संजय इंगवले, सुरेश पाटील, अण्णासो कदम, अमर कांबळे, सविता कुंभार, सविता कदम, अस्मिता पाटील, वर्षा गावडे, जयश्री पवार यांनी सहकार्य केले.

# निवडणुकीनंतर अपक्ष नगरसेवकांनी केलेली आघाडी ही निवडणुक पुर्व उच्च न्यायालयाच्या पूर्णपीठाचा महत्वपूर्ण निर्वाळा

**महाबळेश्वर** : नगरपालिकेत अपक्ष म्हणुन निवडुन आलेल्या नगरसेवकांनी आघाडी केली तर ती केवळ विषय समित्यांमधील सहभागापुरती मर्यादित मानली जाणार नाही अशी आघाडी ही निवडणूक पर्वच गृहीत धरली जाईल व पालिकेच्या पुर्ण कालावधीत सर्वच प्रकारच्या उद्दिष्टांकरीता ग्राहय धरली जाईल असा महत्वपूर्ण निर्वाळा उच्च न्यायालयाच्या पाच न्यायमूर्तींच्या पूर्णपीठाने दिला

मुंबई उच्च न्यायालयाच्या न्या नितीन जामदार न्या गिरीश कुलकर्णी न्या भारती डांगरे न्या मनीष पितळे व न्या अमित बोरकर यांच्या पूर्णपीठाने हा ऐतिहासिक निर्वाळा दिला आहे कायदयातील तरतुदींचा असा अन्वयार्थ लावला नाही तर पालिकेत घोडेबाजाराला प्रोत्साहन मिळेल असे महत्वपूर्ण निरीक्षणही पूर्णपीठाने आपल्या निर्णयात नोंदविले आहे या निर्णयामुळे पालिकेतील घोडेबाजारास आळा बसेल

महाबळेश्वर पालिकेची २०११ साली सार्वत्रिक निवडणूकी पार पडली या निवडणुकी नंतर डी एम बावळेकर यांची लोकमित्र जनसेवा आघाडीने सत्ता मिळविली या आघाडीचे डी एम बावळेकर हे नगराध्यक्ष झाले विरोधी गटातील निवडुन आलेल्या काही अपक्षांनी एकत्र येवुन महाबळेश्वर विकास आघाडी या नावाने आघाडी करून त्याची जिल्हाधिकारी यांच्याकडे नोंदणी केली नोंदणी पत्रात ही आघाडी केवळ विविध विषय समित्यांच्या निवडणुकी करीता करण्यात आल्याचे नमुद करण्यात आले होते आघाडीच्या नोंदणी नंतर पालिकेत विविध विषय समित्यांची निवडणुक जाहीर झाली विषय समित्यांमध्ये काही इच्छुक उमेदवरांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल करताना त्या मध्ये अपक्ष नगरसेवक असा उल्लेख करण्यात आला विरोधकांनी खेळलेल्या या राजकारणामुळे पालिकेतील सर्वच विविध विषय समित्यांवर विरोधकांनी बाजी मारली

महाबळेश्वर विकास आघाडीतील नगरसेवकांनी विषय समित्यांसाठी अर्ज दाखल करताना अपक्ष नगरसेवक असा उल्लेख केल्याने त्यांनी स्वेच्छेने आघाडीचे सदस्यत्व सोडल्याने विरोधी गटातील सर्व नगरसेवकांना अपात्र ठरविण्यात यावे असा अर्ज नगराध्यक्ष डी एम बावळेकर यांनी सातारा जिल्हाधिकारी यांचे कडे केला सातारा जिल्हाधिकारी यांनी नगराध्यक्ष डी एम बावळेकर यांच्या अर्जा नुसार दोन्ही पक्षांची सुनावणी घेवुन २७ सप्टेंबर २०१६ रोजी विरोधी गटातील नगरसेवकांना अपात्र घोषित केले जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या निर्णया विरोधात महाबळेश्वर पालिकेतील विरोधी गटातील नगरसेवकांनी उच्च न्यायालयात धाव घेतली.

पालिकेतील स्थायी समितीसह विविध विषयांवरील समित्यांवर नोंदणीकृत पक्ष व आघाडी यांच्या बरोबरच अपक्षांचेही योग्य प्रतिनिधीत्व रहावे या साठी महाराष्ट्र नगरपालिका नगरपंचायत व औदयोगिक नगरे कायदा १९६५ या कायदयातील कलम ६३ , २ब मध्ये तरतुद आहे त्या नुसार पालिका निवडणुकी नंतर ३० दिवसांच्या आत विजयी अपक्ष उमेदवारांना आघाडी करून तिची नोंदणी करणे नोंदणी करणे आवश्यक आहे नोंदणी केल्या नंतर अशी आघाडी ही निवडणुकपूर्वच असल्याचे मानून त्या आघाडीला अपात्रता कायदयाच्या तरतुदी लागु होतील असेही पालिका कायदयात नमुद करण्यात आले आहे

# सातारा रत्नागिरी बस सेवेला प्रशासनाचा अडथळा

## एसटी सेवा सुरू करा अन्यथा याद राखा : माजी उपनगराध्यक्ष सुहास राजेशिर्के यांचा इशारा

**सातारा** : कोकणातून साताऱ्यात स्थायिक झालेल्या कोकणस्थ बांधवांसाठी माजी उपनगराध्यक्ष सुहास राजे शिर्के यांच्या प्रयत्नाने सातारा रत्नागिरी एसटी बस सेवा सुरू करण्यात आली होती मात्र सातारा मध्यवर्ती आगार प्रशासनाच्या उदासीनतेमुळे या बससेवेला फटका बसत आहे. साताऱ्यातून रत्नागिरी गाडीचे रिझर्वेशन केले असता प्रवाशांना उंब्रज अथवा कराड पर्यंत जाण्याचा मनस्ताप सोसावा लागत आहे सातारा रत्नागिरी बस सेवा सुरळीत करा त्या मार्गासाठी नवीन गाडी द्या अन्यथा याद राखा गाठ माझ्याशी आहे असा इशारा माजी उपनगराध्यक्ष सुहास राजेशिर्के यांनी दिला आहे.

रत्नागिरी आणि सातारा या दोन जिल्ह्यांचे अंतर सुमारे १२० किलोमीटर आहे .सातारा आगाराकडून करोनापूर्वीच्या काळामध्ये तब्बल ३० वर्षे सातारा रत्नागिरी बस सेवा सुरू होती. या सेवेचे सातारा आगाराला मिळणारे उत्पन्न दिवसाला २३ ते २५ हजार रुपये इतके होते मात्र गेल्या साडेतीन ते चार वर्षापासून ही बस सेवा सातत्याने तांत्रिक कारण देऊन खंडित केली जात आहे. गेल्या वर्षभरापासून माजी उपनगराध्यक्ष सुहास राजेशिर्के यांनी सातारा मध्यवर्ती आगाराचे विभाग नियंत्रण रोहन पलंगे यांच्याकडे पाठपुरावा करून ही बस सेवा पुन्हा एकदा नव्याने सुरू केली. साताऱ्याच स्थायिक झालेल्या कोकणस्थ बांधवांना रत्नागिरीला जाण्यासाठी मोठी सोय उपलब्ध झाली होती.



सध्या आगामी श्रावण महिना गौरी गणपती हा कोकणस्थ बांधवांचा गडबडीचा हंगाम लक्षात घेता सातारा रत्नागिरी बस सेवा तातडीने सुरू होणे गरजेचे आहे .सातारा आगाराकडून रत्नागिरी गाडीचे रिझर्वेशन घेतले जाते मात्र त्यांना पंढरपूर गाडीत बसून देतो किंवा उंब्रज अथवा कराडला जाऊन तिथून बदली गाडी घ्यावी अशा सूचना दिल्या जातात .त्यामुळे एकाच तिकिटाच्या पैशांमध्ये प्रवाशांना बदली बस करून जावे लागते आणि आर्थिक भुर्दंड पडतो तो वेगळाच .पंढरपूर यात्रेसाठी जादा बसेस सातारा कडून सोडण्यात आल्या होत्या मात्र यात्रा संपूर्ण ही आता सहा दिवस उरले अद्याप सातारा रत्नागिरी बस ही उपलब्ध होत नाही मग बस उपलब्ध नसताना सातारा रत्नागिरी बसचे रिझर्वेशन कसे घेतले जाते? असा संतप्त सवाल येथील प्रवाशांनी विचारला आहे या संदर्भात माजी उपनगराध्यक्ष सुहास राजेशिर्के यांनी सातारा रत्नागिरी बस सेवा नवीन गाडीसह सुरळीत करा असा इशारा दिला आहे बस सुरळीत न झाल्यास गाठ माझ्याशी आहे असा इशारा त्यांनी आगार प्रमुखांना दिला आहे याबाबत त्यांनी दिलेल्या इशारा पत्रात नमूद आहे की मी मूळचा कोकणातील असून जन्मभूमी रत्नागिरी आणि कर्मभूमी सातारा आहे येथील कोकणस्थ बांधवांना कोणी वाली नाही असे समजू नका सातारा रत्नागिरी बस तातडीने सुरू करा अन्यथा आम्हाला आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल असे त्यांनी पत्रकात नमूद केले आहे.

# रस्ते विकास महामंडळाने केवळ परवानग्यांची कामे करू नये

## न्यू महाबळेश्वर प्रकल्पासाठी पर्यावरण पूरक विकासाचा आमदार शिवेंद्रसिंहराजे यांचा पुनरुच्चार

**सातारा** : रस्ते विकास महामंडळाने अधिकृत एजन्सी म्हणून न्यू महाबळेश्वर प्रकल्पाची जबाबदारी घेतली आहे. सातारा जिल्ह्याचे मध्यवर्ती ठिकाण म्हणून सातारा शहरात या विभागाचे कार्यालय असावे येथील अधिकाऱ्यांना संबंधित तांत्रिक परवानग्याची पूर्ण परवानगी मिळावी तसेच एजन्सीने केवळ परवानगी देण्याचे काम करू नये तर प्राधिकृत प्राधिकरण म्हणून न्यू महाबळेश्वर प्रकल्प पर्यावरण पूरक कसा होईल यासाठी त्यांनी लक्ष पुरवावे अशा स्पष्ट सूचना आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी केल्या.

सातारा पंचायत समितीच्या सभागृहात न्यू महाबळेश्वर प्रकल्पाच्या प्रारूप आराखड्यावरील अभिप्राय नोंदीसाठी आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी सातारा पंचायत समितीचे गटविकास हजार अधिकारी सतीश बुध्दे तसेच एमएसआरडीसीचे प्राधिकृत अधिकारी क्रेडाईचे संचालक व पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. राज्य शासनाने पाचगणी व महाबळेश्वर या दोन गिरीस्थानांवरील पर्यटनाचा बोजा कमी करून अन्य ठिकाणी पर्यटनस्थळे विकसित करण्याच्या दृष्टीने न्यू महाबळेश्वर प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी पावले उचलली आहेत. सातारा, पाटण, महाबळेश्वर, जावली येथील २३५ गावांचा समावेश या प्रकल्पात करण्यात आला असून त्यांचा प्राथमिक आराखडा बनवण्यात आलेला आहे. गेल्या दोन दिवसापासून या तालुक्यातील पंचायत समितीमध्ये प्रारूप आराखड्याची मांडणी आणि नागरिकांचे अभिप्राय घेण्याची प्रक्रिया एम एसआरडीसीच्या माध्यमातून सुरू आहे. सातारा पंचायत समितीच्या सभागृहात मंगळवारी या संदर्भात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली या बैठकीमध्ये पर्यावरण स्नेही मंडळींनी या प्रकल्पाची अंमलबजावणी होत असताना जैवदृष्ट्या संवेदनशील असलेल्या नियमांची कठोरपणे अंमलबजावणी व्हावी आणि या भागांमध्ये असणारी अन्नसाखळी वनसंपदा तसेच प्राणी पक्षी यांचे परिसंचलन हे प्रभावित होऊ नये अशी महत्त्वपूर्ण मांडणी केली. सातारा प्रादेशिक योजनेतील समुद्रसपाटीपासून १००० मीटर पेक्षा उंचावरील क्षेत्राकरिता नियमावलीनुसार विकास करणे बंधनकारक आहे. पर्यावरण सुरक्षा कायदा १९८६ च्या तरतुदीनुसार पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील असताना क्षेत्रासाठी आवश्यक निर्बंधांचे पालन व्हावे, महाबळेश्वर पाचगणी नगर परिषदेमधील नियमाप्रमाणे वीस अंश पेक्षा तीव्र उतारावर बांधकाम अनुज्ञेय होणार नाही, केंद्रीय पर्यावरण वने व वातावरणीय बदल नवी दिल्ली यांचे मार्फत तीन ऑक्टोबर २०१८ च्या प्रारूप पश्चिम घाट इको सेन्सिटिव्ह झोनचे रक्षण करणे याकरिता लागू असलेल्या अधिसूचना बंधनकारक ठेवणे, सह्याद्री व्याघ्र प्रकल्पातील केंद्र शासनाच्या नियमावलीचे निर्देश पालन होणे या बाबी मानद वन्यजीव संरक्षक सुनील भोईटे बैठकीत मांडताना त्या सूचना लेखी स्वरूपात सादर केल्या.

या संदर्भात बोलताना आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी न्यू महाबळेश्वर विकास प्रकल्प हा पर्यावरण आणि पर्यटन या दोन्ही दृष्टीने संतुलित होणे गरजेचे आहे येथील तरुणांना आणि शेतकऱ्यांना पर्यटनाच्या निमित्ताने रोजगार निर्माण होणे व पर्यावरणाचा विचार करता येथील अन्नसाखळी येथील वृक्षसंपदा यांचे संरक्षण होणे याशिवाय नवीन बांधकामे होताना ती पर्यावरण पूरक असणे अशा विविध बाबींवर भर दिला या दृष्टीने एमएसआरडीसी ने पर्यावरण तज्ञांच्या सूचना घेऊन त्या अभिप्रायांचा अभ्यास करून तशी सुटसुटीत योजना तयार करावी असे निर्देश त्यांनी केले या योजनेची जास्तीत जास्त वेगाने अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने रस्ते विकास महामंडळाचे अधिकृत कार्यालय सातारा शहरात असावे तसेच येथील अधिकाऱ्यांना तांत्रिक परवाना देण्याचे पूर्ण अधिकार असावेत अशा सूचना शिवेंद्रसिंह राजे यांनी करत यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांशी सुद्धा चर्चा केली आहे .राज्य शासनाच्या परवानगीने साताऱ्यात एमएसआरडीसीचे सुसज्ज कार्यालय या प्रकल्पाच्या संचलनासाठी असणे गरजेचे आहे त्याकरता राज्य शासनाकडे परवानगी मागितली जाणार आहे रस्ते विकास महामंडळाने केवळ परवानग्यात देऊ नयेत तर पर्यावरण पूरक प्रकल्प कसा साकारता येईल या दृष्टीने सुटसुटीत आराखडा तयार करावा असे स्पष्ट निर्देश आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी दिले.

# असंवेदनशील सरकारच्या घोषणा देत सरकारचा केला जाहीर निषेध

**वडूज** : वडूज ता खटाव येथे उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना गटाच्या उपनेत्या छायाताई शिंदे, जिल्हा प्रमुख सातारा महिला संघटीका सलमा शेख व तालुका प्रमुख शहाजीराजे गोडसे यांच्या मार्गदर्शना खाली तहसील कचेरीवर मोर्चा काढण्यात आला. यावेळी नायब तहसिलदार सुनिल जाधव यांना निवेदन देण्यात आले. दरम्यान यावेळी उबाठा शिवसेना गटाच्या वतीने वडूज शहरातून असंवेदनशील केंद्र व राज्य सरकारच्या विरोधात निषेधाच्या घोषणा देत मोर्चा काढण्यात आला. यावेळी महिला तालुका प्रमुख मन्सुरा मुलाणी, उपतालुका प्रमुख संध्या देशमुख, विभाग प्रमुख धनश्री इनामदार, शहरप्रमुख कांचन जाधव, सुनिता जाधव, संध्या चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती.

येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकातून निघालेला निषेध मोर्चा थेट तहसिल कार्यालयावर धडकला. या प्रंसगी बोलताना उबाठा गटाच्या उपनेत्या छायाताई शिंदे म्हणाल्या की, जम्मू कश्मीरमधील भावीक भक्तावर झालेला भ्याड हल्ला, मुंबई येथे युवतीवर मंदिरात पूजाऱ्यांनी बलात्कार करून तिचा केलेला खून, तसेच कावेरी नाकवा यांच्या अंगावरती गाडी घालून चिरडण्याऱ्या मारेकरी अशा घटना घडून ही केंद्र सरकार व राज्य सरकार याबाबत गंभीर नाही. या सर्व घटनांचा निषेध करून या सरकारला जाग आणण्यासाठी आणि झालेल्या घटनामध्ये सरकारने तातडीने मारेकऱ्यांना अटक करावी व पीडीतांना न्याय द्यावा अशी मागणी यावेळी त्यांनी केली.

तालुका प्रमुख शहाजीराजे गोडसे म्हणाले की, केंद्र व राज्य सरकारच्या अनागोंदी कारभारामुळे देशात व प्रामुख्याने राज्यात कायदा व सुव्यवस्थेचे तीन-तेरा वाजले आहेत. संबधीत अपराध्यांच्या सरकारने मुसक्या आवळल्या पाहिजेत असे न घडल्यास यापुढे तिव्र आंदोलन केले जाईल असा इशाराही त्यांनी यावेळी दिला.

यावेळी माधवी जोशी, रंजना निकम, रेखा सोनवणे, काजल बुचडे, मधुकर मोहिते, हणमंत देवकर, बाळासो शिंदे यांच्या सह असंख्य शिवसेना उबाठा गटाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# सर्व पेट्रोल पंपानी सुरक्षतेचा अहवाल सादर करावा : जिल्हा पुरवठा अधिकारी वैशाली राजमाने

**सातारा** : हिंदुस्थान पेट्रोलियम कार्पोरेशन लि., इंडियन ऑईल कार्पोरेशन लि., भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लि. या सर्व कंपनीचे सेल्स ऑफीसर यांना सातारा जिल्हयातील सर्व पेट्रोल पंपाचे भूमिगत टाकीची तात्काळ तपासणी करून त्यामध्ये पावसाचे पाणी जात नसलेबाबत खातरजमा व सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक त्या सर्व बाबींची तपासणी करून अहवाल सादर करावा, अशा सूचना जिल्हा पुरवठा अधिकारी वैशाली राजमाने यांनी केल्या

इथेनॉल मिश्रित पेट्रोल विक्रीच्या अनुषंगाने जिल्हा पुरवठा अधिकारी श्रीमती राजमाने सातारा यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला सेल्स ऑफिसर हिंदुस्थान पेट्रालियम कार्पोरेशन लि. शिखर श्रीवास्तव, सेल्स ऑफिसर इंडियन ऑईल कार्पोरेशन लि. मयंक अग्रवाल, सेल्स ऑफिसर भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लि. सुभाष गुप्ता, विपुल शहा, रितेश रावखंडे, प्रदिप सांगावकर, रमेश हलगेकर, प्रकाश पारेख, केदार नाईक यांच्यासह जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेचे सदस्य हे उपस्थित होते.

सर्व पेट्रोलपंप चालक यांनी सुरक्षेच्या दृष्टीने कोणती काळजी घ्यावी याबाबत सर्व सेल्स ऑफीसर यांनी पेट्रोलपंप चालक यांना आवश्यक त्या सूचना द्याव्यात, असे सांगून जिल्हा पुरवठा अधिकारी श्रीमती राजमाने म्हणाल्या, सद्यस्थितीत इथेनॉल मिश्रित पेट्रोल असल्याने ह्याचा सर्व्हिसिंग करताना, गाडी धूताना किंवा इतर काही कारणास्तव पाण्याशी संपर्क आला तर यामधील इथेनॉल हे पेट्रोल पासून विभक्त होते व ते पाण्यासह गाडीच्या टाकीशी तळाशी साचते व गाडी स्टार्ट करताना किंवा चालवताना त्रास होवू शकतो. प्रत्येक वाहन धारकांनीही वाहनाच्या टाकीतील पेट्रोलचा पाण्याशी संपर्क येणार नाही याची काळजी घ्यावी तसेच याबाबतचे माहीतीचे फलक प्रत्येक पेट्रोल पंपावर लावावेत.

इथेनॉल मिश्रीत पेट्रोलची साठवणूक व हाताळणूक यासाठी आवश्यक मानकानुसार सर्व पेट्रोल पंपावर पायाभूत सुविधा उपलब्ध करून घेण्यात याव्यात जेणेकरून वाहनांच्या इंधन क्षमतेवर परिणाम होणार नाही.

# नवीन महाबळेश्वरला विरोध करण्याआधी पर्यावरण प्रेमींनी प्रत्यक्ष भेटून स्थानिकांच्या व्यथा ऐका

## नवीन महाबळेश्वर प्रारुप विकास आराखडा बैठकीत सर्व उपस्थितांचा सूर

**पाटण** : पाटण तालुका भौगोलिक दृष्ट्या डोंगर दऱ्याखोऱ्यांचा, निसर्ग संपदेचा तसेच धरणग्रस्त, प्रकल्पग्रस्तांचा आहे. या तालुक्यातील ग्रामीण भागातील नागरिकांनी पर्यावरण, निसर्ग संपदेचे रक्षण केले आहे. कोयना, चांदोली अभयारण्य व नदी खोऱ्यात राहणाऱ्या नागरिकांनी येथील जैवविविधता जपली आहे. पिढ्यानपिढ्या येथे राहणाऱ्या नागरिकांना पर्यावरण कसे जपावे व ते कसे वाढवावे याचे चांगलेच ज्ञान आहे. खऱ्याअर्थाने पर्यावरण राखणाऱ्या ग्रामीण भागातील नागरिकांचा अर्थिक स्तर व स्थानिक विकास साधायचा असेल तर पर्यटन विकास साधल्याशिवाय पर्याय नाही. शहरात राहणाऱ्यां पर्यावरण प्रेमींनी नवीन महाबळेश्वर प्रकल्पाला विरोध करताना पर्यावरण जपणाऱ्या ग्रामीण भागातील नागरिकांशी थेट संपर्क साधावा खरे पर्यावरण काय असते ते आम्ही त्यांना सांगू असा इशारा देत पाटण तालुक्यात नवीन महाबळेश्वर प्रकल्प झालाच पाहिजे.. अशी मागणी बहुचर्चित नवीन महाबळेश्वर प्रकल्पाच्या प्रारुप आराखड्यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडिसी) पंचायत समिती पाटण येथे आयोजित केलेल्या बैठकीत उपस्थित सर्व नागरिकांनी केली.

पाटण तालुक्यात भौगोलिक दृष्ट्या अडचणी असल्याने उद्योग व्यवसाय व रोजगार निर्मिती करणारे कोणतेच मोठे प्रकल्प आले नाहीत. भुकंपग्रस्त, अतिवृष्टी, सततच्या नैसर्गिक आपत्तीमुळे येथे रोजगार निर्माण करणारे मोठे उद्योग धंदे, व्यवसाय आले नाहीत. याउलट तालुक्यावर लादलेले इको सेन्सिटिव्ह, पश्चिम घाट, कोयना - चांदोली अभयारण्य, व्याघ्र प्रकल्पाच्या जाचक अटी व निर्बंधामुळे पाटण तालुका पुरता उध्वस्त झाला आहे. वन्यप्राण्यांचा वाढता प्रादुर्भाव, शेतींचे नुकसान, या प्राण्यांचे नागरिकांच्यावर होणारे जीवघेणे हल्ले यामुळे या तालुक्यातील जनता पुरती हैराण झाली आहे. यामुळे येथील लोकांचे जीवन जगणे मुश्कील झाले आहे.

# परळी खोऱ्यात पावसाचा हाहाकार, अनेक पूल पाण्याखाली

**परळी :** परळी खोऱ्यात गेल्या दोन दिवसापासून पावसाने हाहाकार केला असून अनेक पूल पाण्याखाली गेले आहेत झाडे उन्मळून पडली आहेत तर लावंघर येथील बंधारा फुटला आहे येथिल जनजीवन

विस्कळीत झाले आहे. खबरदारीचे उपाय म्हणून शाळेला दुपारनंतर सुट्ट्या देण्यात आल्या आहेत.

परळी ठोसेघर, चाळकेवाडी , केळवली पाटेघर , सांडवली,परिसरात पावसाची जोरदार बॅटिंग सुरू असून येथील जनजीवन विस्कळीत झाले आहे. परळी नजीक असलेल्या परळी पाटेघर रस्ता लगत जुगाई देवी येथील ओड्याला पाणी आल्यामुळे या मार्गावरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आहे.

लावांघर येथील मस्करवाडी करंजे जोडणारा पूल पाण्याखाली गेला असून या पुलावरून पाणी वाहत असल्यामुळे येथील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आहे . या पुलावरून पाणी शेजारील शेतात घुसल्याने शेतीचेही नुकसान झाले आहे.

लावघर येथील शेती बंधारा अतिवृष्टीने वाहून गेला असून येथील बंधाऱ्याला भगदाड पडले आहे .

अरेदरे सोनवडी गजवडी या गावांना जोडणाऱ्या पुलावरून पाणी वाहत असल्याने हा मार्ग पूर्णपणे बंद झाला आहे. त् अरे दरे शेळकेवाडी सोनवडी या मार्गावरील वाहतूक बंद झाली आहे . गजवडी सोनवडी येथील शेतकऱ्यांना पूला पलीकडे शेतामध्येही जाता येणे शक्य नाही.

ठोसेघर गावातील शाळेजवळ झाड उन्मळून पडल्यामुळे विजेचे खांब वाकले असून विजेच्या तारा लोम्बकळत असल्यामुळे हा मार्ग वाहतुकीसाठी बंद झाला आहे .शाळेत प्राथमिक आरोग्य केंद्राकडे जाणारा रस्ता बंद झाला आहे. किल्ले सज्जनगड मार्गावरही दोन-तीन ठिकाणी झाडे उन्म ळून पडली आहेत तर रस्त्यावर मातीचा भराव वाहून आल्यामुळे येथील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती हा मार्ग सुस्थितीत करण्यासाठी रामदास स्वामी संस्थांचे कर्मचारी झटत आहेत. ठोसेघर पठारावरील चिखली जगमीन पांगारे पळसावडे हे प्रकल्प हि ओसंडून वाहत आहेत उरमोडी धरणपात्रात ही पाण्याची लक्षणीय वाढ होत असून आज दुपारपर्यंत पाच टी. एम.सी पाणीसाठा झाला होता अनेक गावांमधून रस्त्याचे ओढानाल्यांचे पाणी शेतात घुसल्यामुळे भात शेतीचे नुकसान झाले आहे. डोंगरदऱ्यातील मातीच्या घरामधून पाणी येत असल्यामुळे घरात उपळे फुटू लागले आहेत. पावसाचा जोर कमी न झाल्यास भात शेतीचे नुकसान होण्याचा धोका निर्माण झाला आहे.



## विनामूल्य प्रवेश; ऐतिहासिक वस्तूंविषयी मोठी उत्सुकता

**सातारा :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याची, इतिहासाची साक्ष देणारे प्रेरणादायी वस्तू संग्रहालय पाहण्यासाठी शालेय विद्यार्थ्यांची मोठी गर्दी होत आहे. या संग्रहालयात असलेल्या ऐतिहासिक वस्तूंविषयी विद्यार्थ्यांत मोठी उत्सुकता दिसून येत आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते नुकतेच वस्तू संग्रहालयाचे उदघाटन झाले आहे. या संग्रहालयात शिवकालीन शस्त्रे, पत्रांचा संग्रह, शिवकालीन नाणी, चिलखत, तलवारी, तोफा अशा वैविध्यपूर्ण, पाहावयास मिळत आहेत. विद्यार्थ्यांना त्याबद्दल आकर्षण दिसत आहे. विद्यार्थ्यांसाठी सकाळच्या सत्रात हे वस्तू संग्रहालय विनामूल्य पाहायला उपलब्ध करण्यात आले आहे. लंडन येथील व्हिक्टोरिया अल्बर्ट म्युझियममधील ऐतिहासिक वाघनखे नुकतीच या संग्रहालयात आणण्यात आली आहेत. त्यांचीही भुरळ विद्यार्थ्यांत दिसून येत आहे. यानिमित्त संग्रहालयात असलेली सतराव्या, अठराव्या शतकातील शस्त्रास्त्रे व ऐतिहासिक वस्तू विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी उपयुक्त ठरत आहेत. छत्रपती शिवरायांच्या जाज्वल्य पराक्रमाचा इतिहास या वस्तू संग्राहलयातून पुढे येत आहे. तो विद्यार्थ्यांपर्यंत पोचविण्यासाठी जिल्हा परिषदेने पुढाकार घेतला आहे. त्या दृष्टीने नियोजन करण्यात आले आहे.

# हवामानातील सततच्या बदलांमुळे शेती संकटात

## निसर्ग चक्र बदलते आहे

**फलटण :** फलटण हा रब्बीचा तालुका, मात्र अलीकडे निसर्ग चक्रात होणारे बदल, बदलते ऋतुमान, त्यामुळे हवामानात होणारे बदलांमुळे खरीप, रब्बी असा फरक राहिला नाही. पाण्याची उपलब्धता आणि साधारण मिळते जुळते हवामान विचारात घेऊन बळीराजा विविध पिके घेऊ लागला आहे. त्यातही हवामानात अचानक बदल झाल्यास पेरणी झालेल्या पिकाची अवस्था बिकट होऊ शकते अशी शेती व शेतकऱ्यांची स्थिती कठीण झाली आहे.

त्या पार्श्वभूमीवर फलटण तालुक्यात शेतकऱ्यांनी खरिपातील विविध पिके घेतली, बागायती पट्ट्यात आडसाली ऊसाच्या लागणी सुरु केल्या, दरम्यान नीरा उजव्या कालव्याला भगदाड पडले आणि कालवा बंद झाला, लागणी झालेल्या आणि लागणी अपूर्ण असलेल्या दोन्ही क्षेत्रातील ऊस जोपासणार कसा असा प्रश्न निर्माण झाला. पण पावसाने आधार दिल्याने लागण झालेल्या ३५६३ हेक्टर क्षेत्राला जीवदान मिळाले, वजन घटेल पण ऊस उभा राहिला मात्र लागण सुरु असलेल्या क्षेत्रातील बियाणे (बेणे), मजुरी वाया गेली.

आडसाली लागण अपूर्ण असल्याने धरणांच्या पाणलोट क्षेत्रात नेहमी जून पासून सुरु होणाऱ्या पावसाकडे आणि धरणातील पाणी साठ्यांकडे सर्वांचेच लक्ष लागून राहिले पण संपूर्ण जून गेला. जुलैची १० तारीख आली तरी धरण क्षेत्रात पावसाला सुरुवात नसल्याने बळीराजा धास्तावला मात्र, जुलै १० नंतर पावसाला सुरुवात झाल्याने धरणांच्या पाणी साठ्यात वाढ होऊ लागली असून सर्वत्र समाधान निर्माण झाले आहे. फलटण तालुक्यात पावसाची वार्षिक सरासरी ४५९.९ मि.मी. असून सोमवार दि. २२ जुलै अखेर तालुक्यात २८१.६० मि.मी. म्हणजे सरासरीच्या ५५.४६ टक्के पाऊस झाला आहे.

आज मंगळवार दि. २३ जुलै रोजी सकाळी घेतलेल्या माहितीनुसार २३.५० टीएमसी क्षमतेच्या भाटघर धरणात १२.९४४ टीएमसी म्हणजे ५५.०७ टक्के, ३.६९ टीएमसी क्षमतेच्या गुंजवणी धरणात २.२७२ टीएमसी म्हणजे ६१.५७ टक्के, ११.७३ टीएमसी क्षमतेच्या नीरा - देवघर धरणात ५.६७ टीएमसी म्हणजे ४८.३६ टक्के, ९.४१ टीएमसी क्षमतेच्या वीर धरणात ५.६८ टीएमसी म्हणजे ६०.४१ टक्के, ३.९६ टीएमसी क्षमतेच्या धोम - बलकवडी धरणात १.९१ टीएमसी म्हणजे ४८.२० टक्के पाणी साठा झाला आहे.

# प्रतापसिंहनगरात गॅस्ट्रोची साथ; ग्रामपंचायतीच्या डोळ्यावर पट्टी

**सातारा:** सातारा शहराला लागूनच असलेल्या प्रतापसिंह नगरात गॅस्ट्रो डेंगू मलेरिया सारख्या साथीच्या रोगाने थैमान घातले असून नगरातील अनेक जण खाजगी आणि शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल आहेत. पावसाळ्यात दूषित पाणी आणि डासापासून होणाऱ्या या आजाराची काळजी ग्रामपंचायतीने घेणे आवश्यक होते, दूषित पाणी साठी योग्य काळजी गेले डासांचा प्रादुर्भाव वाढू नये म्हणून फवारणी करणे, वाढलेली झाडी गवत कापणे अशी कामे ग्रामपंचायत खेडमार्फत होणे अपेक्षित होते.मात्र यातील एकही उपाय ग्रामपंचायत मार्फत केला गेला नसल्याने परिसरात मोठ्याप्रमाणात नागरिक आजारी पडत आहेत.

ग्रामपंचायती मार्फत होत असलेल्या गडुळ आणि मातिमिश्रित पाण्यामुळे आजाराचे प्रमाण वाढले आहे काही भागात पिण्याच्या पाण्यात अळ्या देखील आढळून आल्या आहेत. या बाबत ग्रामपंचायत खेड सरपंच अथवा सदस्य कोणतीच पाऊल उचलताना दिसत नाहीत



खेड ग्रामपंचायतीत प्रतापसिंह नगरातून तीन सदस्य जातात मात्र या तिन्ही सदस्यांचा याकडे कोणतेही लक्ष असल्याचे दिसत नाही उलट हे सदस्य आपापला व्यवसाय करण्यात इतके व्यस्त आहेत की नगरात लोक साथीच्या रोगाने आजारी आहेत अनेकजण रुग्णालयात उपचार घेत आहेत हे सुध्दा त्यांना माहीत नाही,

नगरातील सदस्य म्हणजे म्हणजे असून खोळंबा आणि नसून बोंबाबोंब अशी अवस्था आहे त्या मुळे नागरिकांमध्ये कमालीची नाराजी पसरली आहे मतदान करून ज्यांना निवडून

### गढूळ आणि दूषित पाण्याने नागरिकांना पोटाचे आजार सुरू झाले आहेत

**या बाबत ग्रामपंचायत खेड कडून तातडीने उपाययोजना करण्यात याव्यात नागरिकांना शुद्ध व स्वच्छ पाणी उपलब्ध करून देण्यात यावे , डासांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी धुराची फवारणी करण्यात यावी अशी मागणी परिसरातील राहणाऱ्या गोरगरीब जनतेकडून होत असून ग्रामपंचायत या बाबत तातडीने उपाय योजना करतील अशी माफक अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.**

दिले ते जर डुंकूनही पहात नसतील तर मतदान करण्याचा फायदा काय असा सवाल नागरिक करत आहेत,

ग्रामपंचायतिच्या असल्या ढिसाळ कारभारामुळे नागरिकांना या साथीच्या रोगाला सामोरे जावे लागत आहेत परिसरात मोठ्या प्रमाणात झाडी आणि गवत वाढल्याने डासांची उत्पत्ती हि वाढली आहे.

## साताऱ्यात सलग पाचव्या दिवशी पावसाची जोरदार बॅटिंग

**सातारा :** गेले पाच दिवस सातारा शहर परिसरामध्ये संतत धार पावसाने जोरदार बॅटिंग सुरू ठेवली असून मंगळवारी रात्रीपासून या पावसाचा जोर मोठ्या प्रमाणात वाढला आहे .बुधवारी पहाटे तसेच बुधवारी दिवसभरही या पावसाचा जोर प्रचंड प्रमाणात होता. गेले पाच दिवस सातारा शहर परिसरातील नागरिकांना सूर्यदर्शन झालेले नाही .
बुधवारी सकाळपासून वेगाचे वारे आणि त्यातच येणाऱ्या जोरदार सरी यामुळे शहरातील प्रमुख रस्ते सुनेसुने दिसत होते. अनेक नागरिकांनी कामाशिवाय घरातून बाहेर न पडणे पसंत केले .
त्यातच शहरातील राजवाडा, राधिका रोड ,नगरपालिका परिसर चौकामध्ये पाण्याची मोठी तळी साचली होती. झोंबणारे वारे आणि गारठ्यामुळे हवेत गारवा निर्माण होऊन आजाराचे प्रमाणही वाढल्यामुळे अनेक दवाखान्यातून तसेच डॉक्टरांकडे रुग्ण तपासणीसाठी तसेच उपचारासाठी गर्दी करून आल्याचे दिसून येत होते.







**बुधवारी सकाळपासून वेगाचे वारे आणि त्यातच येणाऱ्या जोरदार सरी यामुळे शहरातील प्रमुख रस्ते सुनेसुने दिसत होते. अनेक नागरिकांनी कामाशिवाय घरातून बाहेर न पडणे पसंत केले .त्यातच शहरातील राजवाडा, राधिका रोड, नगरपालिका परिसर चौकामध्ये पाण्याची मोठी तळी साचली होती. सातारा शहरातील मोती चौक तसेच समर्थ मंदिर रस्त्यावर जोरदार पावसाचे सरींमुळे वाहतूक तुरळक दिसून येत होती. फोटो : अतुल देशपांडे सातारा**

# प्रत्येक गावाचा सर्वांगीण विकास साधल्याचे समाधान

## आ. शिवेंद्रसिंहराजे; आनेवाडी येथे विकास सेवा सोसायटीच्या इमारतीचे उदघाटन

**सातारा :** सातारा- सातारा- जावली मतदारसंघात प्रत्येक गावात, वाडी- वस्तीवर विकासगंगा पोहचली आहे. जावली तालुक्याचा सर्वांगीण विकास साधताना पर्यटनवाढ आणि त्यातून व्यवसायवृद्धी, रोजगारनिर्मितीला प्राधान्य दिले आहे. त्यादृष्टीने विविध रस्त्यांचे रुंदीकरण, मजबुतीकरण, काँक्रीटीकरण केले जात आहे. मतदारसंघाचा विकास साधताना ग्रामस्थांना अपेक्षित विकासकामे मार्गी लावली आहेत. असंख्य कामे पूर्ण झाली आहेत तर, अनेक कामे प्रगतीपथावर आहेत. मतदारसंघातील प्रत्येक गावाचा सर्वांगीण विकास साधता आला, याचे मनस्वी समाधान आहे, असे प्रतिपादन आ. श्रीमंत छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी केले. आनेवाडी ता. जावली येथे महात्मा फुले विकास सेवा सोसायटीच्या नूतन इमारतीच्या उदघाटनप्रसंगी आ. शिवेंद्रसिंहराजे बोलत होते. यावेळी जेष्ठ नेते दादा पाटील, प्रतापगड सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन सौरभ शिंदे, अधीक्षक कृषी अधिकारी भाग्यश्री फरांदे, विभागीय विकास अधिकारी अण्णासाहेब फरांदे, डॉ. प्रमोद फरांदे, सरपंच वैशाली फरांदे, उपसरपंच अमित फरांदे, डॉ. निरंजन फरांदे, सोसायटीचे चेअरमन विवेक पवार, व्हा. चेअरमन विजय फरांदे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. एक जबाबदार लोकप्रतिनिधी म्हणून जावली तालुक्यात आजअखेर कोट्यवधींची विकासकामे मार्गी लावली आहेत. माझे आणि जावलीकरांचे आपुलकीचे, जिव्हाळ्याचे असे अतूट नाते आहे. प्रत्येक गावाचीच नव्हे तर, प्रत्येक नागरिकाची समस्या सोडवण्याचा प्रामाणिक प्रयत्न मी नेहमी करत असतो. आनेवाडी गावातही अनेक विकासकामे मार्गी लावली आहेत. ग्रामस्थांच्या मागणीनुसार येथील प्रत्येक समस्या सोडवण्यात येईल, असे आ. शिवेंद्रसिंहराजे म्हणाले. कार्यक्रमाला जेष्ठ सभासद महादेव फरांदे, ऍड. मनोहर फरांदे, शेखर फरांदे, रघुनाथ फरांदे, सोसायटीचे संचालक बाळासाहेब पाटील, साहेबराव फरांदे, रमेश फरांदे, सुरेश फरांदे, कल्याण फरांदे, संकेत फरांदे यांच्यासह सर्व आजी- माजी संचालक, विविध पदाधिकारी, ग्रामस्थ आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



**आनेवाडी येथे विकास सेवा सोसायटीच्या इमारतीचे उदघाटन करताना आ. श्रीमंत छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले. शेजारी दादा पाटील, सौरभ शिंदे व मान्यवर.**

## जांभुळणीच्या सरपंचपदी कविता सरगर बिनविरोध



**वरकुटे- मलवडी :** जांभुळणी ता. माण येथील ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे अभयसिंह जगताप पुरस्कृत,कविता भागवत सरगर यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली.

सुनिता महादेव कोकरे यांनी राजीनामा दिल्याने,रिक्त झालेल्या सरपंच पदासाठी जांभुळणी ग्रामपंचायत इमारतीत निवड प्रक्रिया पार पडली.

यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून कृषी मंडलचे जयदीप बनसोडे,ग्रामसेवक बापू काळेल यांनी काम पाहिले.

याप्रसंगी उपसरपंच बापू काळेल, सिद्धार्थ तोरणे, सिंधु कोकरे, सुनिता कोकरे, चंद्रभागा काळेल, राणी काळेल, स्वाती काळेल, आदी ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते.

सर्वसामान्य महिला ग्रामपंचायत सदस्याला बिनविरोध सरपंच पदाची संधी मिळाल्याने,कार्यकर्ते आणि समर्थकांनी गुलालाची उधळण करीत फटाक्यांच्या आतिषबाजीत हालगीच्या निनादात गावातून मिरवणूक काढली.



**सोळशी येथील शनैश्वर देवस्थान परिसरात गुरूपौर्णिमा निमित्त भाविकांनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती. (रणजित लेंभे)**

## शनैश्वर देवस्थान परिसरात गुरूपौर्णिमा उत्साहात साजरी

**पिंपोडे बुद्रुक :** धार्मिक स्थळासह सामाजिक प्रबोधनाचे अधिष्ठान असलेल्या, सोळशी येथील श्री शनैश्वर देवस्थान परिसरात रविवार दि. २१ जुलै रोजी गुरूपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली. गुरूपौर्णिमा या ठिकाणी विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामुळे या ठिकाणी सकाळी पासून रात्री उशिरा पर्यत भाविकांची मोठी गर्दी झाली होती.

सोळशी, ता. कोरेगाव येथील श्री सोळा शिवलिंग शनैश्वर देवस्थान परिसरात मठाधिपती प.पु शिवयोगी नंदगिरी महाराज यांच्या संकल्पनेतून धार्मिक कार्यासह विविध सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. गुरूपौर्णिमा सणाचेनिमित्त साधत या ठिकाणी सकाळी साडे सात वाजता प. पु. त्यागेश्वर महाराज समाधीस रुद्राभिषेक करण्यात आला.

त्यानंतर महाआरती व प. पु. शिवयोगी नंदगिरी महाराज यांचे आर्शिवचन पार पडले. त्यानंतर उपस्थितांकडून मठाधिपती यांची पाद्यपूजा करण्यात आली. भाविकांसाठी या ठिकाणी दिवसभर महाप्रसाद व मठाधिपती यांचे चरणस्पर्श दर्शनाची व्यवस्था करण्यात आली होती. दर्शनासाठी भाविकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी झाली होती.

## शाही चॅरिटेबल ट्रस्टच्या उदघाटन समारंभाच्या निमित्ताने मोफत शालेय साहित्य वाटप



**बिदाल :** शाही चॅरिटेबल ट्रस्ट दिवडच्या वतीने दिवड, ता.माण येथे इंदिरा गांधी विद्यालय व ज्यू कॉलेज दिवड मधील गरजू विद्यार्थ्यांना मोफत शालेय साहित्य वाटप करण्यात आले.

यावेळी बोलताना अध्यक्ष रियाज मुलाणी म्हणाले की, शैक्षणिक व आरोग्य क्षेत्रात या शाही ट्रस्टच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात काम करू. ही संस्था आगामी काळात ग्रामीण भागामध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात मदत करू. रियाज मुलाणी, तोहित सय्यद, माजी सरपंच जाकीर सय्यद, प्राचार्य एस. बी. गोरे , चंद्रकांत सावंत, सौरभ सावंत, महाराष्ट्र चॅम्पियन पैलवान अनिल सरगर ट्रस्टचे सर्व विश्वस्त सर्व शिक्षक व दिवड ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# समाधी मंदिर फुलांच्या माळांनी सजले

## गुरु पौर्णिमा अध्यात्मिक कार्यक्रमांनी रंगली

**परळी :** किल्ले सज्जनगड समर्थ भक्तांच्या गर्दीने आणि मुसळधार पावसाने अक्षरशा चिंब झाला. साताऱ्याच्या पश्चिमेला सध्या मुसळधार पाऊस सुरू आहे अशातच गुरु पौर्णिमेला किल्ले सज्जनगडावर समर्थ भक्तांनी समाधीचे दर्शन घेण्यासाठी गर्दी केल्याने सज्जनगड गर्दीने भरून गेला होता.किल्ले सज्जनगडावर रामदास स्वामी संस्थान, समर्थ सेवा मंडळाच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

समाधी मंदिर मोगऱ्या च्या फुलाने सजवण्यात आले होते यावेळी आकर्षक अशी फुलांची सजावट फुलांचा सुगंध भाविकांना आकर्षित करीत होता श्रीधर कुटी येथेही आकर्षक फुलांची सजावट सर्वांना मनमोहित करीत होती. पहाटे काकड आरती शोडोपचार पूजा झाल्यानंतर भाविकांनी दर्शन घेण्यास सुरुवात केली यावेळी गायन भरतनाट्यम असे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

समर्थ सेवा मंडळाच्यावतीने श्रीधर कुटी येते परमपूज्य श्रीधर स्वामी व समर्थ रामदास स्वामी यांच्या पादुकांना दुग्धाभिषेक महाआरती करण्यात आली यानंतर सर्वांना दर्शन देण्यात आले गडावर सकाळपासूनच दर्शनासाठी रांगा लागल्या होत्या भर पावसाची राज्याच्या कानाकोपऱ्यातून भाविक दर्शनासाठी आले होते यावेळी सर्व भाविकांना महाप्रसादाची सोय करण्यात आली होती. सज्जनगड बस स्थानक वाहनांनी भरून गेले होते वाहनधारकांची वाहने लावताना कसरत होती.